# ऋ ण नि र्दे श

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. पदवीसाठी "रणजित देसाई यांची ग्रामीण कादंबरी" ("बारी" व "माझा गाव" यांच्या अनुषंगाने) हा लघुप्रबंध सादर करताना मला अनेक व्यक्तींचे मोलाचे मार्गदर्शन व प्रेमळ सहकार्य लाभले. त्या सर्वांचा येथे ऋणनिर्देश करणे मला आवश्यक आहे.

हा प्रबंध पूर्ण करण्यास गुरुवर्य प्रा.डॉ. गो.मा. पवार यांनी फारच मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच या लघुप्रबंधाला मूर्तरूप आले. म्हणून त्यांच्या ऋणात राहाण्यातच मला आनंद वाटतो.

प्रा.डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी हा प्रबंध पूर्ण करण्यास प्रेरणा देऊन वेळो-वेळी आत्मीयतेने सहकार्य केल्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे. प्रा.डॉ.ल.रा. नसिराबादकर, प्रा. प्रभाकर पाटील, प्रा. रवींद्र ठाकूर यांचेही सहकार्य मिळाले म्हणून त्यांचाही मी ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सेवकवर्ग, तसेच श्री शाहू वाचनालय सरवडे, तुरंबे विद्यालय तुरंबे येथील ग्रंथपाल व सेवक वर्ग यांनी मला लागणारी संदर्भाची पुस्तके वेळोवेळी उपलब्ध करून दिली याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे.

कमालीच्या प्रतिकूल परिस्थितीशी झगडत सर्व शिक्षण पूर्ण करण्यासाठी आणि तितक्याच कमालीच्या सहजतेने एम्. फिल्. ची संधी चालून यावी याचे मला सुखद आश्चर्य वाटते. याकरिता मला माझे आई-वडील, आजी, भाऊ - तुकाराम जरग, तसेच दिनकर पाटील, मारुती वारके (आबा), राजाराम साठे, माझे बालपणापासूनचे मित्र विजय मोरे व इतर मित्रमंडळी यांनी मला दिलेले प्रेम व मानसिक स्वास्थ्य यामुळेच मी हे प्रबंधाचे काम पूर्ण करू शकलो. तसेच हा प्रबंध टाईप करणारे श्री विष्णूपंत खाडे यांचे आभार मानल्याखेरीज हे मनोगत पूर्ण होवू शकत नाही.

- पांडुरंग रघुनाथ जरग

....